# मिरा भाईंदर महानगरपालिका

## प्रभाग कार्यालय क्र. ०५

सय्यद नजर हुसैन भवन, रसाज टॉकीज जवळ, मिरारोड पुर्व
दुरध्वनी क्र.२८१२३४०९, २८१३११०१

जा.क्र.मनपा/प्र.का.मि-५/२८० /२०१६-२०१७ दि:- 23/11/16

प्रति,
मा. सिस्टिम मॅनेजर सो.,
संगणक विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

संगणक विभाग
आवक क्र: ५९८
दिनांक : 24/11/16

**विषय :- सार्वजनिक प्राधिकरण संकेत स्थळावर माहिती प्रसिध्दी करणेबाबत.**
**संदर्भ :- द्वितीय अपिल क्र. के.आर/४६३५/२०१५ अन्वये सुनावणी अंती दि.०२/०९/२०१६ रोजीचा अहवाल.**

महोदय,

उपरोक्त संदर्भिय मा. राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांचेकडील द्वितीय अपिल क्र. के.आर-४६३५/२०१५ दि. ०२/०९/२०१६ रोजी झालेल्या निर्णया नुसार मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत फेरीवाला व ना फेरीवाला क्षेत्राबाबतचे धोरणासंबंधि मा. महासभा दि. १९/०७/२००८ चा ठराव क्र. २९ अन्वये पारित झालेला ठराव व मा. स्थायी समिती सभा दि. १४/११/२००९ अन्वये ठराव भाईंदर पुर्व व पश्चिम, मिरारोड ते चेणा विभाग बाजार वसुली अभिकर्ता (एंजट) नेमणुक बाबतचा पारित झालेल्या ठरावानुसार फेरीवाला व ना फेरीवाला क्षेत्रात बसलेल्याकडुन बाजार फी आकारण्यांत यावी याबाबतचा ठरावबाबत व शासनाचे फेरीवाला संबंधिचे सध्याचे धोरण संबंधि माहिती मा. समाजविकास अधिकारी यांचेमार्फत मनपा संकेत स्थळावर प्रसिध्दी करणे आवश्यक व फेरीवाला व ना फेरीवाला क्षेत्र संबंधि माहिती सार्वजनिक संकेतस्थळावर प्रसिध्दी देणेसंबंधि मा. राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांनी दि. ०२/०९/२०१६ रोजी सुनावणी अंती निर्णय पारित केल्याने ठरावाबाबत अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

तरी वरीलप्रमाणे ठरावाच्या प्रती व माहिती यापुर्वी मनपाचे संकेत स्थळावर प्रसिध्द केलेली नसल्याने कृपया तातडीने प्रसिध्दी द्यावी व प्रसिध्द झाल्याबाबत इकडील कार्यलयास कळविण्यांत यांवे.

प्रभाग अधिकारी
प्रभाग कार्यालय क्र. ०५, मिरारोड

सोबत :- १) मा. महासभा दि. १९/०७/२००८, ठराव क्र. २९ ची प्रत
२) मा. स्थायी समिती दि. १४/१०/२०१५, ठराव क्र. ८८ ची प्रत.

## मा.स्थायी समिती सभा दि. १४/१०/२०१५

**प्रकरण क्र. ९१ :-** **भाईंदर (पूर्व) व मिरारोड ते चेणा विभागातील बाजार फी वसुली अभिकर्ता (एजंट) नेमणुकीबाबत.**

ठराव क्र. ८८ :-

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या क्षेत्रात भाईंदर (पूर्व) व मिरारोड ते चेणा विभागातील फेरीवाल्याकडून बाजार फी वसुली करण्यासाठी दि.१७/०९/२०१५ रोजी फेर जाहिर निविदा सुचना वृतपत्रात व महानगरपालिकेचे संकेतस्थळावर प्रसिध्दीस देवून इच्छुक ठेकेदारानी बाजार बोली लिलाव दि.३०/०९/२०१५ रोजी सकाळी ११.०० वा. प्रभाग समिती कार्यालय क्र.६ येथे ठेवण्यांत आल्याबाबत जाहिर आवाहन करण्यांत आले होते. त्यानुसार भाईंदर (पूर्व) व मिरारोड ते चेणा विभागाचा बाजार बोली लिलाव घेण्यासाठी महानगरपालिकेच्या निविदा समिती सदस्यांच्या उपस्थितीत बाजार बोली लिलाव घेण्यांत आला. त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे

| अ.क्र. | विभागाचे नांव | किमान देकार रक्कम | प्राप्त देकार रक्कम | देकार धारकाचे नांव |
|---|---|---|---|---|
| १. | भाईंदर (पूर्व) | १,९१,००,५०९/- | १,९१,५०,५०९ | श्री. जावेद अब्बास राजा |
| २. | मिरारोड ते चेणा | २,००,८९,४१३/- | २,०१,७९,४१३/- | श्री.अनिल काजरोळकर |

वरील तपशिलाप्रमाणे रस्त्यावर बसणाऱ्या फेरीवाल्याकडून बाजार फी वसुली करण्यासाठी भाईंदर (पूर्व) विभागाकरीता प्राप्त अभिकर्ते श्री.जावेद अब्बास राजा यांची रु. १,९१,५०,५०९/- व मिरारोड ते चेणा विभाग श्री. अनिल काजरोळकर यांची रु.२,०१,७९,४५३/- ही अंतिम बोली मान्य करुन भाईंदर (पूर्व) व मिरारोड ते चेणा विभागात फेरीवाल्याकडून बाजार फी वसुलीबाबत अभिकर्ता म्हणुन अनुक्रमे श्री. जावेद अब्बास राजा भाईंदर (पूर्व) व श्री. अनिल काजरोळकर मिरारोड ते चेणा या विभागासाठी नियुक्ती देण्यास ही सभा मान्यता देत आहे. तसेच बाजार फी एक चौ. मीटर साठी रुपये २५/- आहे. परंतु एक चौ.मीटर पेक्षा अधिक जागा फेरीवाले व्यापत असतील तर त्यासाठी दोन पावत्या दयावा लागतात त्याऐवजी महानगरपालिकेने रु.२५/-, रु.५०/- व रु. ७५/- अशा किंमतीच्या पावत्यांची कुपने छपाई करुन संबंधित अभिकर्त्यांना देण्यात यावीत तसेच ना फेरीवाला क्षेत्रात बसणाऱ्या फेरीवाल्यांवर फेरीवाला पथकामार्फत सतत कारवाई करण्यांत यावी कारवाई होत असतानाही फेरीवाले नाफेरीवाला क्षेत्रात बसल्यास त्यांच्याकडून बाजार फी आकारण्यांत यावी. रात्रीची सफाई होण्याकरिता फेरी फिक्स नसावी. फिक्स गाडी व फेरवाल्यांवर जप्तीची कारवाई व्हावी. पुढील आवश्यक प्रशासकिय कार्यवाही मा. आयुक्त मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी करावी.

सुचक :- डॉ. राजेंद्र जैन

अनुमोदन :- श्री. जयंतीलाल पाटील

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजुर**

सभापती
स्थायी समिती सभा
मिरा भाईंदर महानगरपालिका

यापूर्वी मा.महासभा दि.१९/०७/२००८ ठराव क्र.२९ अन्वये महानगरपालिका परिसरातील ग्रये फेरीवाला क्षेत्र व नाफेरीवाला क्षेत्र जाहिर केले असुन नाफेरीवाला क्षेत्र सार्वजनिक रस्त्यांवर बसणाऱ्या फेरीवाल्यांकडून बाजार फी वसुली करणाऱ्या ठेकेदाराविरुध्द कराराचा भंग केला म्हणुन दंडात्मक कायदेशिर कारवाई करावी असा ठराव आहे. त्यानुसार महानगरपालिकेचे प्रभाग क्षेत्रीय अधिकाऱ्यामार्फत नाफेरीवाला क्षेत्रातील फेरीवाले वेळोवेळी हटविण्यांची कारवाई होते. परंतु कारवाई होवून सुध्दा पुन्हा फेरीवाले ना फेरीवाला क्षेत्रांत बसतात त्यामुळे मा.स्थायी समिती सभेत वरील प्रमाणे ठराव मंजुर केला आहे. तसेच बहुतांश फेरीवाल्यांच्या गाडयांची लांबी रुंदी एक चौ.मिटर पेक्षा अधिक असते. त्यामुळे फेरीवाल्यांना रु.२५/-च्या दोन पावत्या दिल्यांवर ते तक्रारी करतात त्यामुळे एक चौ.मिटर पेक्षा अधिक परंतु दोन चौ.मिटर पर्यंत जो फेरीवाला रस्त्यावर जागा व्यापेल त्याला रु.५०/- ची पावती व पुढे जागेच्या प्रमाणात रु.७५/- ची पावती याप्रमाणे ठराव मंजुर केला आहे.

तरी वरीलप्रमाणे मा.स्थायी समिती सभेत मंजुर ठरावाच्या अनुषंगाने कारवाई करणेबाबत, तसेच संबंधित अभिकर्त्याकडून करारनामा स्वाक्षांकित करुन कार्यादेश देणेस मान्यतेस्तव शिफारस आहे. 'क्ष'

[सोबत कार्यादेश स्वाक्षरीस्तव ठेवण्यांत आलाआहे.]

लिपीक

मिळकत व्यवस्थापक

मा.उपायुक्त (मिळकत) प्र.के-५

19/10/15

'क्ष' मधील प्रस्ताव मंजुरीस शिफारस असे.

28.10.15

मा. आयुक्त

29/10/15

प्रकरण क्र. २७ :- मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत फेरीवाला व ना-फेरीवाला क्षेत्राबाबतचे धोरण निश्चित करणे आणि ना-फेरीवाला क्षेत्रामधील फेरीवाल्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २३१ अन्वये काढून टाकणे.

ठराव क्र. २९ :-

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २३१ अन्वये विना परवानगी चालू असलेल्या फेरीवाल्यांना व सार्वजनिक ठिकाणी विक्री करणाऱ्या व्यक्तींना नोटीस न देता काढुन टाकण्याची तरतुद आहे. अशाप्रकारे महानगरपालिका हद्दीत कार्यवाही करणेपूर्वी फेरीवाला क्षेत्र व ना-फेरीवाला क्षेत्र ठरविणे आवश्यक आहे.. तसेच शहरातील जनतेच्या अडचणीचा व रहदारीचा विचार करता शहरातील काही भाग हा फेरीवाला मुक्त करणे आवश्यक आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत फेरीवाला, ना-फेरीवाला क्षेत्राचे धोरण ठरविताना यापूर्वी याबाबत वेळोवेळी झालेल्या मा. स्थायी समिती व मा. महासभेच्या निर्णयाचा तसेच या विषयी स्थापन करण्यांत आलेल्या अधिकाऱ्यांच्या व पदाधिकाऱ्यांच्या समितीच्या अहवालाचा विचार करता विभाग निहाय खालीलप्रमाणे फेरीवाला, ना-फेरीवाला क्षेत्र करावे.

१) भाईंदर (पश्चिम) विभाग

| अ.क्र. | ना-फेरीवाला क्षेत्र | फेरीवाला क्षेत्र |
|---|---|---|
| १ | छत्रपती शिवाजी महाराज मार्ग (मोदी पटेल नाका ते भाईंदर सेकंडरी स्कुल ते नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान) | डॉ. आंबेडकर रोड महावीर अपार्टमेंट ते विनायक पॅलेस रस्त्यापर्यत. |
| २ | पोलिस स्टेशन भाईंदर रेल्वे फाटक पर्यंतचा रस्ता. | राम मंदीर मार्ग पोलिस स्टेशन ते जैन मंदीर पर्यंत. फुटपाथवर बैठकी विक्रेते |
| ३ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग (६० फुट रोड) बावन जिनालय जैन मंदिर ते बनी पॅलेस पर्यंतचा रस्ता. | शास्त्री नगर रस्त्याची डावी बाजू. रेल्वे फाटक समोर कमला पार्क व वालचंद कॉम्पलेक्स. |
| ४ | बावन जिनालय परिसर. | प्रकाश मार्केट ते जोशी निकेतन रस्त्याची उजवी बाजू. रस्त्यावर खाद्यपदार्थ विक्रेते गुरुकृपा बिल्डींगपर्यंत. |
| ५ | जे. एच. पोद्दार हायस्कूल रोड. | चर्च ते महानगरपालिका कार्यालय (जूने) (मिना बाजार ते मोती नगर) |
| ६ | महाराजा अग्रसेन मार्ग. | भाईंदर (प.) येथे आठवडयाच्या बाजाराकरीता वरील दिलेल्या रस्त्यांवर फेरीवाले बसवता येण्यांस परवानगी देण्यांत येत आहे. |
| ७ | जयप्रकाश नारायण मार्ग. | सदासत्य अपार्टमेंट ते अमृतवाणी अपार्टमेंट रस्त्याच्या डाव्या बाजूस. |
| ८ | स्टेशन रोड ते बालाजी वसाहत ते रेल्वे पादचारी पुल, विनायक मंदीर मार्ग. | |
| ९ | भाईंदर स्टेशन ते पोलीस चौकी. | |
| १० | जनता नगरकडे जाणारा रस्ता. | |
| ११ | राममंदीर रोड | |
| १२ | मोदी पटेल रोड | |
| १३ | जैन मंदीरच्या बाजूने देवचंद नगरकडे जाणाऱ्या दोन्ही गल्ली. | |
| १४ | टेंभा हॉस्पीटल रोड | |

| | | |
|---|---|---|
| ६ | शांतीनगर सेक्टर ११ पाण्याची टाकी ते सृष्टीकडे जाणारा रस्ता. | पुजा नगर [illegible] |
| ७ | मिरा रोड स्टेशन शांतीनगर गेट. ते शितल नगर नाकापर्यंत | शांतीनगर सेक्टर-६ व फेस-३ मधील एक बाजू. सेक्टर-६ च्या एक बाजू. |
| ८ | मिरारोड स्टेशन नयानगर रिक्षास्टॅड ते शितल नगर नाकापर्यंत | नीदा पार्क ते लेजेसी बिल्डींग पर्यंत एक बाजू. |
| ९ | पोस्ट ऑफीस मिरा रोड ते शांतीनगर सेक्टर क्र. १ ते ४ मधील दोन्ही बाजू | सेक्टर नं. ५ सी-३८ कार्नर ते बी-२६-२७ एक बाजु. |
| १० | शांती नगर सेक्टर क्र. ३ ते ६ मधून सृष्टीकडे जाणारा रस्ता दोन्ही बाजू. | |
| ११ | शितल नगर नाका ते जांगीड कॉम्प्लेक्स दोन्ही बाजू. ते सिल्वर पार्क सिग्नलपर्यंत दोन्ही बाजू. | |
| १२ | सेक्टर नं. ६, बी-१ ते अे-७ पर्यंत एक बाजू. | |
| १३ | शांतीनगर सेक्टर नं. १ व २ मधील रस्ता | |
| १४ | शांतीनगर सेक्टर नं. २ व ३ मधील रस्ता | |
| १५ | मिरारोड पूर्व पुनम सागर कॉम्प्लेक्स मधील अंतर्गत रस्ता | |
| १६ | गणपती मार्बल ते रामदेव पार्क पर्यंतचा रस्ता. | |
| १७ | शांतीनगर सेक्टर नं. ३ व ४ मधील रस्ता | |
| १८ | सृष्टी सेक्टर नं. ५ व ३ मधील रस्ता | |
| १९ | सृष्टी सेक्टर नं. २ व ३ मधील रस्ता | |
| २० | रॉयल गार्डन हॉटेल ते सिल्वर पार्क सिग्नल पर्यंतच्या रस्त्याच्या दोन्ही बाजूला. | |
| २१ | मिरारोड पूर्व नरेंद्र पार्क ज्युपीटर बिल्डींग शेवटच्या दुकानापासून ते अस्मिता व्हिनटेज पर्यंत दोन्ही बाजू. | |
| २२ | नयानगर हैदरी मस्जिद ते संघवी एम्पायर पर्यंत. | |
| २३ | मिरारोड पूर्व नयानगर मिरा नर्सिंग होम गल्ली झुबेदा बिल्डींग ते ऑर्चीड बिल्डींग पर्यंत दोन्ही बाजू. | |

४) काशीमिरा, मिरा गावठण व इतर हायवे लगत क्षेत्र

| अ.क्र. | ना-फेरीवाला क्षेत्र | फेरीवाला क्षेत्र |
|---|---|---|
| १ | मिरा गावाच्या हायवे लगतचा रोड. | मिरागाव टॅक्स ऑफिस पासून ते पटेल प्लाझा इमारती पर्यंत. |
| २ | मिरा गावाकडे जाणारा रस्ता. | |
| ३ | निलकमल ते लिबर्टी तबेल्यापर्यंत जाणारा रस्ता ते गांवदेवी मंदिर मार्ग. | |
| ४ | राष्ट्रीय महामार्ग क्र. ८. (दहिसर चेकनाका ते वर्सोवा नाका) | |
| ५ | छत्रपती शिवाजी महाराज पुतळयापसून ते उड्डाण पुलापर्यंत मिरा भाईंदर मुख्य रस्ता व फाटक पर्यंत. | |

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील ३० फुट व त्यापेक्षा रुंद असणारे सर्व रस्ते ना फेरिवाला क्षेत्र म्हणून घोषित करण्यात यावा.

वरील प्रमाणे महानगरपालिका हद्दीत फेरीवाला व ना-फेरीवाला क्षेत्र निश्चित करणेत आले आहे. ना-फेरीवाला क्षेत्रात फेरीवाल्यांना बसण्यांस मनाई असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २३१ अन्वये ना-फेरीवाला क्षेत्रातील बसणाऱ्या फेरीवाल्यांना त्याठीकाणाहुन काढून टाकण्यांत यावे. अशा फेरीवाल्यांकडुन जप्त केलेले साहित्य, सामान त्यांना परत न करता त्यांच्यावर दंडात्मक कायदेशीर कारवाई करावी.